REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | MARCH - 2024

# भारतातील महिलांचे सक्षमीकरण आणि विकास

भारत सर्जेराव जमधडे

**प्रस्तावना :**



भारतीय महिलांचे सक्षमीकरण करायचे असेल तर प्रथम त्यांच्या मध्ये विकासविषयक जागृती निर्माण करायला हवी. एकदा महिलाची प्रगती झाली की, तिच्यासोबत तिच्या गावाची प्रगती होते आणि पर्यायाने संपूर्ण देशाची प्रगती होते. कारण सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य करताना विकास प्रक्रियेत सहभागी असलेल्या सक्रिय घटकासोबतच दुर्लक्षित आणि विकास प्रक्रियेपासून दूर असलेल्या घटकांचा देखील समावेश होणे आवश्यक आहे. म्हणून महिलांना विकासा विषयी जागृत करुन त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमात असे म्हटले आहे की, समाजातील अनेक घटक त्याचे लिंग, वंश, लैंगिक अभिमुखता, शारिरीक अथवा मानसिक दुर्बलता तसेच गरिबी या कारणामुळे विकास प्रक्रियेतून वगळले जातात. शहरी तसेच ग्रामीण भागातील महिलांच्या वाट्याला येणारी गरिबी, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून त्यांना दूर ठेवणे आणि मागासललेपण याचे दू:ख कमी करुन शाश्वत विकासात त्याचा सहभाग वळविण्यासाठी १९९० पासून महिलांना समान दर्जा देण्यासाठी आणि त्यांचे सशक्तीकरण करण्यासाठी प्राधान्याने काही उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेत लिंग समानतेला आणि न्याय विकासाला चालना देण्यासाठी जागतिक पातळीवर महिलांच्या सक्षमिकरणाची संकल्पना राबविण्यात विकासकार्य करणाऱ्या स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.

महिलांचे सशक्तीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यात महिलांचे निवडीचे स्वातंत्र वाढते. त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या निर्णयाच्या प्रक्रियेत भाग घेण्याचे, चर्चा करण्याचे, निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचे आणि विविध संस्थांच्या परिचलनात सहभाग होण्याचे स्वातंत्र्य मिळते याची जबाबदारी महिलांना घ्यावी लागणे हेच तिच्या विकासाच्या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे मात्र लिंगभेद टाळून सशक्तीकरणासाठी प्रयत्नशील राहणे हे महत्वपूर्ण ध्येय आधी साध्य करायला हवे. हे जेव्हा महिला लक्षात घेतील तेव्हाच महिलांचे सक्षमीकरण होणे शक्य होईल. महिलांच्या पूर्ण क्षमतांचा वापर करुन त्यांना त्यांच्या ध्येयपूर्तीच्या दिशेने काम करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी स्त्री शक्तीचा उपयोग करुन घेण्याची आवश्यकता आहे. अशा ध्येयाची शक्यता निर्माण होण्यासारखी परिस्थिती तयार करण्यासाठी महिलांची मते आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था याची लिंगभेद विना शक्तीकरण धोरणे आणि कार्यक्रमांच्या उभारणीस मुख्य भूमिका अपेक्षित आहे. सन २०१४ च्या जागतिक बँकेच्या निरीक्षणानुसार, जनतेला निवडलचा अधिकार मिळणे तसेच त्यांच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयाच्या प्रक्रियेत भाग घेण्याचे स्वातंत्र्य घेता येणे चर्चा करता येणे. आपल्या मताचा प्रभाव टाकता येणे, काही अंशी नियंत्रण ठेवता येणे आणि या सर्वांची जबाबदारी स्वीकारता येणे म्हणजेच महिलांचे सक्षमीकरण किंवा सशक्तीकरण होय. आणि हेच खरे महिलांचे स्वावलंबन होय.

महिला सक्षमीकरण ही अनेक पैलु, विविध परिणामे असलेली अनेक पदरी संकल्पना आहे. महिलांचे सक्षमीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये महिलांना वस्तु व्यक्ती आणि ज्ञान माहिती कल्पना या साधनावर तसेच पैशासारख्या आर्थिक स्त्रोतांवर नियंत्रण ठेवता येणे तसेच पैशासंबंधी व्यवहार करता येणे आणि गटात समुदायात, समाजात आणि देशातल्या निर्णयावर मत मांडण्याची शक्ती प्राप्त होते. एवढेच नव्हे तर महिलांना त्यांच्या घरात मत मांडण्याचे स्वातंत्र्य, प्रत्येक बाबतीत योग्यता, कामाच्या जागी न्याय, चांगली वागणूक, स्त्री-पुरुष भेदाभेद, तंत्रज्ञानाचे क्षेत्र, अवकाश विज्ञान, क्रीडा क्षेत्र, सशक्त दले इत्यादी प्रत्येक क्षेत्रात त्यांना रोखणाऱ्या काचेच्या अदृश्य भिंती तोडून टाकल्या आहेत. आता शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात प्रत्येक पाचवी महिला उदयोजिका आहे.

आज महिलाच्या बाबतीत आईच्या पोटात मुलींच्या गर्भाचे संरक्षण करण्यापासून ते काम करणाऱ्या महिलापर्यंत सुरक्षित वातवरण तयार करण्यापर्यंत अनेक उपाययोजना शासनांनी हाती घेतल्या आहेत.

### शोध निबंधाची उद्दिष्टये :

१. महिला सक्षमीकरण संकल्पना स्पष्ट करणे.
२. महिला सक्षमीकरण विषयक कार्यक्रमाचा अभ्यास करणे

### संशोधनाची गृहीतके :

१. महिलांना आज समाजभिमुख करण्याचा प्रयत्न समाजाच्या माध्यमातून होत आहे.
२. महिला संरक्षण व सुरक्षेच्या दृष्टीने सुधारणा होत आहे.
३. महिलांच्या विकासाच्या दृष्टीने विविध योजना विषय कार्यक्रम राबविल्या जात आहेत.

### तथ्य संकलन :

प्रस्तुत लघु संशोधनासाठी द्वितीय आधार सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

### महिला सक्षमीकरणाची व्याख्या :

१. Word Bank '' व्यक्तिला किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतिमध्ये आणि फल प्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय.''
२. किरण देवेंद्र यांच्या मते, ''स्त्री सबलीकरणाचा अर्थ स्त्री ही आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयं निर्भर व स्वावलंबी असणे होय. तिला स्वत:बदल सकारात्मक दृष्टीकोन असावा जेणे करुन कोणत्याही विपरित परिस्थितीला सामोरे जाता येईल. तसेच ती स्त्री विकास कार्यात सहभागी होण्यास पात्र ठरेल. निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल याकरिता शिक्षण हा सबलीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका वठविणारा घटक आहे.

थोडक्यात महिला सक्षमीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये महिलांना वस्तु, व्यक्ती आणि ज्ञान, माहिती, कल्पना या साधनावर तसेच पैशासारख्या आर्थिक स्त्रोतांवर नियंत्रण ठेवता येणे तसेच पैशासंबंधी व्यवहार करता येणे आणि घरात, समुदायात, समाजात आणि देशातल्या निर्णयांवर मत मांडण्याची शक्ती प्राप्त होते.

### महिला सक्षमीकरणाचे स्वरुप :

आजच्या महिला सक्षमीकरणाच्या संदर्भातील महत्त्वाचे म्हणजे आज महिला पोटातील गर्भापासून सुरक्षित आहे. म्हणजेच मातृत्व प्राप्तीच्या कालावधीत तिचे सशक्तीकरण करणे हा देखील महत्त्वाचा विषय आहे. प्रधान मंत्री मातृवंदना योजनेसारख्या केंद्र सरकारच्या योजनेद्वारे महिलांना त्यांच्या गरोदरपणात आणि स्तनपानाच्या कालावधीत आर्थिक संरक्षण पूरविले जाते. या संदर्भातील अत्यंत महत्वाचा निर्णय म्हणजे मातृत्व लाभ कायद्यात सुधारणा करुन नौकरी करणाऱ्या महिलांना ६ महिन्यांची भरपगारी मातृत्व रजा मंजूर करण्यात आली आहे. यासारख्या अनेक स्त्री विकासाच्या

योजना शासनाने महिला सक्षम करण्यासाठी चालू केलेल्या आहेत. त्यांचा आढावा खालील प्रमाणे केंद्र व राज्य शासनाने महिला सक्षम करण्यासंदर्भात चालू केलेले कार्यक्रम किंवा योजना -

**१) महिला शक्ती केंद्र (MSK) :**

सामाजिक सहभागाद्वारे ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्याचे लक्ष्य समोर ठेवून त्याला आधार देण्यासाठी आणि त्यांना भरिव पाठींबा देण्यासाठी महिला शक्तीकेंद्रे (MSK) नावाची नवी उपयोजना महिलांचे सशक्तीकरण आणि संरक्षण अभियान योजनेच्या छत्राखाली सुरु करण्यात आली.

ग्रामीण भागातील महिलांना त्यांचे अधिकार मिळविण्यासाठी तसेच प्रशिक्षण देऊन आणि नव्या क्षमता विकसित करुन त्याचे सशक्तीकरण करण्यासाठी महिला शक्ती केंद्र माध्यम म्हणून उपयोगी पडेल अशा कल्पनेतून या केंद्राची निर्मिती झाली आहे. यासोबतच त्यांच्या सक्षमतेची नेमकी  कल्पना यावी म्हणून देशाच्या निवडक जिल्हा व प्रभागामध्ये ग्रामपंचायत पातळीवर आरोग्य सुविधा, दर्जात्मक शिक्षण, नौकरी उद्योग आणि व्यवसायासंबंधी मागदर्शन, रोजगाराच्या संधी, आरोग्य आणि सुरक्षेसंबंधी जाणीव, सामाजिक सुरक्षा आणि डिजिटल व्यवहाराचे शिक्षण या सुविधा सुलभतेने मिळण्यासाठी आवश्यक एकत्रीत पाठींबा दिला जात आहे. ही योजना ग्रामीण महिलांच्या विशेषत: देशाच्या अत्यंत मागासलेल्या ११५ जिल्हयामधील महिलांच्या सशक्तीकरणात विशेष महत्त्वाची भूमिका निभावण्यात प्रतिबद्ध आहे.

**२) दीनदयाल उपाध्याय अंत्योदय योजना (DAY.NRLM) :**

आजीविका हा ग्रामीण महिलांना  केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला प्रकल्प आहे आणि ग्रामीण महिलांच्या सभागाद्वारे सार्वत्रिक समाज जागृती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी निवड झालेल्या ग्रामीण भागातील प्रत्येक गरीब घरातील किमान एक स्त्री सदस्य ठराविक कालमर्यादेत स्वयं सहाय्यता गटांच्या कार्यात सहभागी होईल याची निश्चिती करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेतील विशेष धोरणे अशा प्रकारे तयार केली होती की, ही योजना समाजातील सर्व दूर्बल घटकापर्यंत पोहचून त्यांचे दारिद्रय निर्मुलन यशस्वीपणे करता येईल व दुर्बल घटकातील महिला सक्षम बनेल यातून निश्चितच महिलाचे राहणीमान उंचावेल.

**३) निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे सशक्तीकरण (EWRS) :**

निवडून आलेल्या महिला प्रतिनिधिचे सशक्तीकरण करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आले. जेणे करुन गावाचे नेतृत्व करण्यासाठी त्यांच्याकडून उपेक्षित असलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्यांना मदत होईल आणि त्यांच्या गावांच्या अधिक उज्ज्वल भविष्यासाठी गावाला मार्गदर्शन करणे त्यांना सोपे जाईल. यापूर्वी गावपातळीवर आलेल्या अनुभवातून असे लक्षात आले की, निवडून आलेल्या स्त्री प्रतिनिधिमध्ये नवी जबाबदारी पेलण्याची क्षमता निर्माण करणे, कर्जपूरवण्याची व्यवस्था करणे, कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे इत्यादी उद्देश आहेत. आरोग्य शिक्षण, उपजिविका, पुरुष प्रतिनिधीकडून हमखास दुर्लक्षित राहणाऱ्या विकासाविषयक मुद्यांवर केंद्रीत झालेले असते.

**४) राष्ट्रीय महिला कोष (RMK) :**

राष्ट्रीय महिला कोष अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना उत्पन्न मिळण्याचे साधन निर्माण करण्यासाठी कोणत्याही अडचणीविना आणि काहीही तारण ठेवायला न लागता ग्राहकस्नेही पद्दतीने छोट्या प्रमाणावर कर्जाची सुविधा देतो. अनेक मध्यस्थ संस्थांच्या मदतीने छोटी कर्ज देणे त्याचे उद्योग विकसित करायला मदत करणे. त्यांना काटकसर करुन आणि क्रेडिट व्यवहारांवर उद्योग चालवायचे मार्ग शिकविणे तसेच स्वयेसाजना गटांमध्ये नेतृत्वगुण विकासासाठी प्रशिक्षण दिले जाते.

**५) महिलांसाठीचे राष्ट्रीय माहिती भांडार (NARI)**

सरकारने महिलांच्या मदतीसाठी सुरु केलेले सर्व कार्यक्रम आणि योजना यांची माहिती नागरिकांना सुलभतेने मिळावी यासाठी सरकारने राष्ट्रीय माहिती भांडार (NARI)  नावाचे नविन पोर्टल तयार केले आहे. महिलांशी संबंधित विविध योजना आणि कार्यक्रम यांच्या बाबतची सर्व माहिती वेळोवेळी या पोर्टलवर अपडेट केली जाते.

**६) उद्योजिका विकास कार्यक्रम :**

हा कार्यक्रम महिलांना त्यांच्या पायावर उभे राहण्यास मदत करतो. प्रधान मंत्री मुद्रा योजना स्टॅन्ड अप, स्टार्ट अप आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अभियाना अंतर्गत येणारे महिलांचे स्वयंसहायता बगट या सर्व योजनांनी महिलांना आर्थिकदृष्टया स्वतंत्र आणि सुरक्षित व्हायला मदत केली आहे. महिलाची स्वत:ची सुरक्षितता आणि सर्वत्र त्यांचे संरक्षण करणे ही बाब स्त्री सशक्तीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे.

**७) महिला पोलिस स्वयंसेवक (MPVS) :**

स्थानिक पोलिसांच्या तुलनेत हे महिला पोलिस जास्त परिणामकारक पर्याय म्हणून सिद्ध होतील असा अंदाज आहे. नागरिक आणि पोलिसांमधील संवाद सुरळीत व्हावा आणि दू:खी महिलांना मदत व्हावी या हेतूने देशाची सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये महिला पोलिस स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली. घरगुती हिंसाचार, बालविवाह, हुंडयासाठी होणारी छळवणूक आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांना होणारी मारहाण या संबंधीच्या घटना घडत असतील तर यासंदर्भात यामधील पोलिस स्वयंसेवक महत्त्वपूर्ण कार्य करतात.

**८) महिला ई-हाट :**

महिलांना खरेदी विक्री व्यवहारांमध्ये समावून घेऊन त्यांचे आर्थिक सशक्तीकरण करण्यासाठी महिला ई हाट हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. महिलांचे स्वयंसहाय्यता गट, बिगर सरकारी संस्था, व्यक्तिगत पातळीवर उद्योग चालविणाऱ्या महिलांच्या उत्पादनांच्या विक्री करता सरकारने उपलब्ध करुन दिलेला हा नवा मंच आहे. या संकेत स्थळाला आतापर्यंत १४५० व्यक्तींनी भेट देवून माहिती घेतली आहे. देशाच्या २२ राज्यांमधील महिलांचे स्वयं सहायता गट बिगर सरकारी संस्था, उद्योग, १८०० उत्पादने आणि सेवा यावर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामाध्यमातून सहा महिन्याच्या कालावधीत उद्योजिका, स्वयंसहायता गट, बिगर सरकारी संस्था यांचे २० लाख रुपयापेक्षा जास्त रकमेचे व्यवहार झाले आहेत.

**९) प्रधानमंत्री उज्जवला योजना :**

भारतीय समाजातील गरीब वर्गाला मदत करण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरु केली आहे. आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या कुटूंबामधील महिलांना स्वयंपाकासाठी द्रवरूप पेट्रोलियम गॅस उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने सरकारने ही योजना सुरु केली आहे. ही योजना महिलांच्या एकूण सशक्तीकरणाच्या गाभ्यात त्याचे आर्थिक सशक्तीकरण येते आणि आर्थिक व्यवहारात स्त्रिचा सहभाग हा त्यातील अत्यंत महत्वाचा घटक आहे. तसेच सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना याच्या माध्यमातून बँक खाते नसलेल्या नागरिकांनादेखील बँकिग सेवा सुलभपणे मिळणे शक्य झाले आहे.

**१०) कौशल्य विकास :**

आपल्या स्त्री कामगार शक्तीची क्षमता वाढविण्यासाठी कौशल्यविकास हा कळीचा मुद्दा आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेद्वारे मोठया संख्येतील युवकांना विविध उद्योगांशी संबंधित कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत या योजनेस प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र मिळवणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी निम्या स्त्री प्रशिक्षणार्थी आहेत.

**निष्कर्ष :**

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, कुटूंबातील मुख्य महिला सक्षम झाल्याशिवाय भारतीय महिला सक्षमीकरण शक्य होणार नाही. कारण भारतीय लोकसंख्याच्या तुलनेत निम्म्यापेक्षा अधिक असलेल्या महिलांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार मिळाल्याशिवाय त्यांच्या सशक्तीकरणाची काळजी घेतल्याशिवाय विकासाच्या मार्गावर प्रगती करता येणार नाही. महिलांच्या विकासासाठी अनेक दिशांनी सुनियोजित प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातून देशाला प्रगतीपथावर पुढे नेता येणार नाही शिवाय भारतातील सर्व सक्षम घटकाची योग्य दिशेने वाटचाल केवळ महिला सक्षमीकरणाच्या कल्याणकारी योजना करतील आणि महिलांना सक्षमीकरणाच्या माध्यमातून नव्या क्षितिजावर नेऊन ठेवतील अशी अशा आहे.

## संदर्भ ग्रंथ


1. Sing R.V. Women Emporment in India, Shree publication and distributors, Delhi-2011
2. Kalpagam V. Arunachalam jaya, Rural Women and Development in India[ Issues and challenges, Rawat publication, satyam apts,sector s, Jawahar Nagar, Jaipur

३. पाटील मनोज, नागरिकासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकासाच्या योजना, चौधरी पब्लिकेशन, जळगाव

४. गायकवाड एम.जे. रोजगार हमी योजना आणि शेतमजूर महिलांचे आर्थिक सबळीकरण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

५. योजना मासिक जानेवारी, २०१६

६. योजना मासिक मार्च २०१९

७. www.women empowerment .com